**Date:** 11th September, 2025

To,
The Listing Department,
National Stock Exchange of India Limited,
Exchange Plaza, Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai — 400051

**Symbol:** VGINFOTECH, **ISIN:** INE0VRH01015

**Subject:** Newspaper advertisement regarding the Notice of EGM & Remote E-Voting

Dear Sir/ Madam,

In terms of Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed copies of the newspaper advertisement regarding the Notice of EGM of the Company, information on Remote E-voting and other related information published in the following newspapers:

a) Sakal (Marathi vernacular edition) dated September 10, 2025 and
b) The Times of India (English edition) dated September 11, 2025,

This will also be hosted on the Company's website at www.vgipl.com.

This is for your information and records.

Thanking You.

Yours truly,
For **Virtual Galaxy Infotech Limited**

ANJALI VINAY PADHYE
Digitally signed by ANJALI VINAY PADHYE
Date: 2025.09.11 18:31:57 +05'30'

**Anjali Vinay Padhye**
**Company Secretary & Compliance Officer**
**Membership no. A23773**

**Encl.: As above**

## अवतीभवती

### आज काँग्रेसचे आंदोलन

**नागपूर :** नागपूर शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीतर्फे बुधवारी (ता.१०) सकाळी ११ वाजता महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयकाविरोधात आंदोलन करण्यात येणार आहे. व्हेरायटी चौकातील गांधी पुतळा येथे आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनात माजी मंत्री, आमदार, माजी आमदार, प्रदेश सेल प्रमुख, प्रदेश पदाधिकारी, शहर काँग्रेस कमिटीचे पदाधिकारी, सर्व ब्लॉक अध्यक्ष, माजी नगरसेवक, मनपा इच्छूक उमेदवार, फ्रंटल सेलचे अध्यक्ष, सेवादल काँग्रेस, महिला काँग्रेस, युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन शहराध्यक्ष, आमदार विकास ठाकरे यांनी केले आहे.

### शेतकऱ्याची आत्महत्या



**काटोल :** काटोल तालुक्यातील खानगाव येथे रविवारी रात्री प्रफुल्ल दादाराव नेरकर (वय ४१) या तरुण शेतकऱ्याने आर्थिक अडचणींना कंटाळून विष प्राशन करून आत्महत्या केली. त्याच्या पश्चात पत्नी प्रीती नेरकर, ११ वर्षांचा मुलगा समर्थ आणि वृद्ध आई-वडील असा परिवार आहे. कुटुंबाचा आधार गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे. प्रफुल्ल शेतीवर अवलंबून होता. सततची नापिकी, उत्पादन खर्च वाढ, शेतमालाला न मिळणारा भाव आणि बँक व सहकारी संस्थांचे मिळून सुमारे ३ लाखांचे कर्ज याचा ताण त्याच्यावर होता. या तणावात येऊन शेतात विष प्राशन करून त्याने जीवन संपवले. घटनेची माहिती मिळताच काटोल पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला असून पुढील तपास सुरू आहे. या घटनेनंतर खानगाव आणि परिसरात शोककळा पसरली असून, शेतकरी संघटनांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी सरकारला तत्काळ मदतीची मागणी केली आहे.

### तलवारीच्या धाकावर हैदोस

**नागपूर :** लष्करीबागेत तलवारीचा धाक दाखवून हैदोस घालणाऱ्या गुंडाला पाचपावली पोलिसांनी अटक केली. आतिश गरीबदास शेंडे (३०) रा. शोभाखेत, गोंडपुरा असे अटकेतील गुंडाचे नाव आहे. आतिश हा सराईत गुन्हेगार आहे. त्याची एक टोळीही आहे. आतिश आणि त्याच्या टोळीविरुद्ध अनेक गंभीर गुन्ह्यांची नोंद आहे. एप्रिल महिन्यातच परिमंडळ क्रमांक १ च्या पोलिस उपायुक्तांनी त्याच्या संपूर्ण टोळीला तडीपार केले होते. यापूर्वी या टोळीला बनावट नोटांच्या खरेदी विक्रीतही अटक झाली आहे. तडीपार असतानाही आतिश सोमवारी रात्री लष्करीबागच्या बुद्ध मूर्ती चौकात आला. तेथे तलवार हवेत फिरवत हैदोस घालू लागला. रस्त्याने ये-जा करणाऱ्यांसह परिसरातील नागरिकांना धमकावू लागला. याबाबत माहिती मिळताच पाचपावली पोलिस घटनास्थळी पोहोचले. घेराबंदी करून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याजवळून तलवार जप्त करण्यात आली. आर्म्स ॲक्टसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्याला अटक केली.

# कष्टकऱ्यांच्या मुलांना चांगले शिक्षण देण्याचे ध्येय

## जाईबाई हिंदी-इंग्लिश प्राथमिक शाळेच्या संचालकांनी मांडली भूमिका

■ सकाळ वृत्तसेवा

सकाळ ज्ञानवाटा

**नागपूर, ता. ९ : समतानगर कष्टकरी-कामगार वर्गाची वस्ती आहे. या वर्गाच्या मुलांनाही चांगले शिक्षण मिळावे आणि ही मुले मुख्य प्रवाहात यावीत, या उद्देशाने श्रीमती जाईबाई हिंदी-इंग्लिश प्राथमिक शाळेची स्थापना केली. आजही याच ध्येयाने शाळा सुरू असल्याचे शाळेच्या संचालकांनी 'सकाळ' कार्यालयात आयोजित ज्ञानवाटा उपक्रमात बोलताना सांगितले. शाळेचे संचालक मोरेश जांभुळकर, संस्थेचे अध्यक्ष प्रवीण मानवटकर व मुख्याध्यापिका जयश्री सोनुले उपस्थित होते.**



**नागपूर :** 'कॉफी विथ सकाळ'मध्ये उपस्थित जयश्री सोनुने, मोरेश जांभुळकर व प्रवीण मानवटकर.

महाकारूणिक तथागत शिक्षण संस्थेची स्थापना १९९४ मध्ये झाली. २००३-२००४ मध्ये या संस्थेअंतर्गत श्रीमती जाईबाई हिंदी-इंग्लिश प्राथमिक शाळेची स्थापना करण्यात आली. सुरुवातीला अनेक अडचणी आल्या. भाड्याच्या जागेमध्ये पहिला वर्ग सुरू केला. पुढे एकेक वर्ग वाढवीत आता आठवीपर्यंत वर्ग असल्याचे प्रवीण मानवटकर यांनी सांगितले.

शाळा म्हणजे ठरावीक अभ्यासक्रम आलाच, मात्र त्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी विशेष मेहनत घेत असल्याचे मोरेश जांभुळकर यांनी सांगितले. प्रत्येक शनिवारी शाळेत बॅग फ्री दिवस असतो. त्या दिवशी अभ्यास न शिकवता अवांतर वाचन, वर्कृत्व, संचालन, लेखन आदी स्पर्धांचे आयोजन केले जाते. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकासाचा हेतू त्यामागे असल्याचे मुख्याध्यापिका सोनुले म्हणाल्या. विद्यार्थ्यांकडून अधिकाधिक अभ्यास शाळेतच करवून घेतला जातो. १-२ विषयांचाच गृहपाठ देतो. मुलांचे आरोग्य, स्वच्छता याकडे शाळेतील शिक्षक विशेष लक्ष पुरवितात. भविष्यात शाळेमध्ये कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याचा मानस संचालकांनी बोलून दाखविला. पालकांनी मुलांना वेळ द्यावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

### क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी

■ शाळेचे विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात आघाडीवर असून अनेक खेळांमध्ये जिल्हास्तरावर व राज्यस्तरावर कामगिरी करीत आहेत. खासदार चषकामध्येही विद्यार्थी उत्कृष्ट कामगिरी करीत आहेत. शाळेची माजी विद्यार्थिनी मनस्वी चव्हाण हिची कबड्डीमध्ये राष्ट्रीय स्तरावर निवड झाली असल्याचे मुख्याध्यापिका सोनुले यांनी आवर्जून सांगितले.

### विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन

■ शाळेमध्ये दरवर्षी विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात येते. कुठलीही शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेली ही मुले नावाजलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांसारखीच एकाहून एक उत्कृष्ट मॉडेल्स तयार करतात. यांचे मॉडेल्स जिल्हास्तरावर क्रमांक मिळवितात. आगामी काळ विज्ञानाचा असल्याने विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांनी भरारी घ्यावी, हा या प्रदर्शनामागचा उद्देश असल्याचे मानवटकर म्हणाले.

### थीम बेस्ड स्नेहसंमेलन

■ विद्यार्थ्यांमधील कलागुणांचा विकास व्हावा, यासाठी दरवर्षी स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये नृत्य-नाटक, संगीत विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. विशेष म्हणजे दरवर्षी स्नेह संमेलनाची थीम ठरवली जाते. यंदा पर्यावरण ही थीम असून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणविषयक जागरूकता निर्माण करणे, हा या मागचा उद्देश असल्याचे जांभुळकर म्हणाले.

# कामठीतील रमानगर उड्डाणपुलाचे लोकार्पण करा

## बहुजन रिपब्लिकन एकता मंचचा इशारा; अन्यथा तीव्र आंदोलन

■ सकाळ वृत्तसेवा

कामठी, ता. ९: रमानगर रेल्वे उड्डाण पुलाचे काम गेली सात वर्षे रखडले असून, आगामी धम्मचक्र प्रवर्तन दिनापूर्वी या पुलाचे लोकार्पण करण्याची जोरदार मागणी बहुजन रिपब्लिकन एकता मंचच्या ॲड. सुलेखाताई कुंभारे यांनी केली आहे.

ड्रॅगन पॅलेस टेम्पल, कामठी हे एक जागतिक ख्यातीचे धम्मस्थळ असून दरवर्षी ८ ते १० लाख अनुयायी देश-विदेशातून येथे भेट देतात. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या काळात, दिक्षाभूमी ते ड्रॅगन पॅलेस असा प्रवास करणाऱ्या अनुयायांची संख्या प्रचंड वाढते. मात्र, कामठी मार्गावरील रेल्वे अंडरपास अरुंद असल्याने मोठ्या बसेस व सिटी बसेसना प्रवेश शक्य नाही. त्यातच सध्या कामठी मेट्रोचे काम सुरू असल्यामुळे हा मार्ग पूर्णपणे एकेरी करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर, कामठी जयस्तंभ चौक ते रमानगर रेल्वे मार्गावर आर.ओ.बी. (रेल्वे ओव्हर ब्रिज) उभारणीचे काम गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. हे काम त्वरित पूर्ण व्हावे, यासाठी बहुजन रिपब्लिकन एकता मंचने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना निवेदन दिले होते. त्यानुसार १२ जुलै २०२५ रोजी जिल्हा पालकमंत्री व संबंधित विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीत पुलाच्या कामात दिरंगाई करणाऱ्या एजन्सीवर चौकशी व दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या दोन दिवस आधीपासूनच लाखो अनुयायी शहरात दाखल होतात. त्यामुळे २५ सप्टेंबरपूर्वी हा पूल पूर्ण करून वाहतुकीसाठी खुला करण्याची गरज आहे, असे ॲड. कुंभारे यांनी नमूद केले. कामठी परिसरात अनुयायांची गर्दी लक्षात घेता प्रशासनाने युद्धपातळीवर रमानगर उड्डाण पुलाचे काम पूर्ण करावे, अशी जनतेतूनही मागणी होत आहे.



**कामठी:** उड्डाण पुलाच्या कामाची पाहणी करताना अधिकारी व ॲड. कुंभारे.

### मुख्य मुद्दे

- ■ रखडलेले आरओबीचे काम ७ वर्षांपासून अपूर्ण
- ■ मोठ्या वाहनांची वाहतूक अडचणीत
- ■ ८ ते १० लाख अनुयायांचे दरवर्षी आगमन
- ■ २५ सप्टेंबरपूर्वी पूल सुरू न झाल्यास तीव्र आंदोलन

# 'असंघटित कामगारांच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करा'



**नागपूर :** राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अनिल अहीरकर यांचा सत्कार करताना राजेंद्र जैन शेजारी श्रीकांत शिवणकर.

**नागपूर, ता. ९ :** असंघटित कामगार आणि अल्पसंख्याक समाजाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे निरीक्षक राजेंद्र जैन यांनी येथे केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या असंघटित विभाग आणि अल्पसंख्याक विभागाच्या मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी नवनियुक्त शहराध्यक्ष अनिल अहीरकर आणि निरीक्षक राजेंद्र जैन यांचा सत्कार झाला. दरम्यान, राजेंद्र जैन यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या ध्येयधोरणांवर प्रकाश टाकला. नवनियुक्त शहराध्यक्ष अनिल अहीरकर म्हणाले, सर्वांना सोबत घेऊन काम करण्याची आणि पक्षाला शहरात अधिक मजबूत करण्याची ग्वाही दिली. त्यांनी पक्षात प्रवेश केलेल्या सर्व नवीन सदस्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या सहकार्याने पक्ष अधिक उंचीवर जाईल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाला अध्यक्षा सुनीता येरणे, लाला चौबे, विशाल खांडेकर, प्रशांत पवार, तानाजी वनवे, हाजी सोहेल पटेल, बजरंग सिंग परिहार, दिलीप पणकुले, जानबा मस्के, मुनाफ बंदुकिया, मेहबूब पठाण, मुमताज बाजी, कल्ला नायक उपस्थित होते. कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर व सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# सातशेहून अधिक शिक्षकांना शासनाच्या आदेशाची प्रतीक्षा

## कार्यमुक्त करण्याची जिल्हा परिषद प्रशासनाकडे मागणी

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ९ : चालू शैक्षणिक वर्षासाठी झालेल्या जिल्हांतर्गत सर्वसाधारण बदली प्रक्रियेत जिल्हा परिषदेत सातशेहून अधिक शिक्षकांचे आदेश जाहीर झाले आहेत. मात्र, या शिक्षकांना अद्याप कार्यमुक्तीचे आदेश मिळालेले नसल्याने ते संभ्रमात आहेत.

सहा महिन्यांपूर्वी सुरू झालेली बदली प्रक्रिया अनेक अडथळे पार करून अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या संकेतस्थळावर बदली आदेश उपलब्ध झाले असून संबंधित शिक्षकांनाही आदेश प्राप्त झाले आहेत. परंतु, पदस्थापित शाळेतून कार्यमुक्त करण्याबाबत अधिकृत आदेश न मिळाल्याने शिक्षकांमध्ये संभ्रमाची स्थिती आहे. आगामी निवडणुकीची



आचारसंहिता लागू झाल्यास अथवा राष्ट्रीय जनगणना कार्य सुरू झाल्यास या कार्यमुक्ती प्रक्रियेत अडथळे निर्माण होण्याची शक्यता शिक्षकांनी व्यक्त केली आहे. ठाणे, वर्धा, अमरावती, अहिल्यानगर, धुळे, वाशीम, यवतमाळ, अकोला, धाराशीव, परभणी, लातूर या जिल्ह्यांमध्ये बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यामुळे नागपूर जिल्ह्यातील शिक्षकांनाही तत्काळ कार्यमुक्त करून अन्य जिल्ह्याप्रमाणेच न्याय मिळावा, अशी शिक्षकांची मागणी आहे.

### प्राथमिक शिक्षक समितीचा इशारा

■ महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष लीलाधर ठाकरे व सरचिटणीस निळकंठ लोहकरे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना दिलेल्या निवेदन दिले. तत्काळ कार्यमुक्ती आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे. याप्रसंगी अनिल नासरे, राजू बोकडे, सुरेश श्रीखंडे, प्रकाश सव्वालाखे, दिगंबर ठाकरे, प्रदीप काजणे यांच्यासह शिक्षक प्रतिनिधी उपस्थित होते.

# मद्यपी कारचालकाने पोलिसावर केला हल्ला

## वर्दी उतरविण्याची धमकी : नाकाबंदी दरम्यान घटना

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ९ : मद्यधुंद कार चालक भरधाव वेगाने जात असताना नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी थांबविण्याचा इशारा केला. यामुळे चिडलेल्या कारचालकाने हुज्जत घालत एका पोलिस कर्मचाऱ्याला धक्काबुक्की केली. इतकेच नाहीतर वर्दी उतरविण्याची धमकीही दिली. पोलिसांनी आरोपी कार चालकाविरुद्ध शासकीय कामात अडथळा निर्माण केल्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. त्याला सूचनापत्र देऊन सोडण्यात आले. शोभित प्रभाकर मेश्राम (४५) रा. गोपालनगर असे आरोपीचे नाव आहे. ही घटना सोमवारी मध्यरात्री कॉटन मार्केट चौकात घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास कॉटन मार्केट वाहतूक झोनद्वारे चौकात नाकाबंदी करून वाहन चालकांची तपासणी सुरू होती. यावेळी झोनमध्ये कार्यरत पोलिस अमलदार विजय यादव पथकासह इतरही कर्मचारी कर्तव्यावर हजर होते. दरम्यान एक कार भरधाव वेगात येताना दिसली. चालक शोभित दारूच्या नशेत असल्याचा संशयाच्या आधारे पोलिसांनी त्याला थांबण्याचा इशारा दिला. मात्र शोभितने कार थांबविली नाही. त्यामुळे यादव यांनी कार बंद करण्यासाठी आतमध्ये हात टाकला असता शोभितने त्यांना धक्का दिला. त्यानंतर शोभितने काच वर चढवून कार पळवली. घटनास्थळी तैनात इतर कर्मचाऱ्यांनी कारचा पाठलाग केला. पोलिसांना मागे येताना पाहून शोभित संतापला. यू-टर्न घेत तो पुन्हा नाकाबंदीच्या ठिकाणी आला. कारमधून उतरत त्याने पोलिसांना शिवीगाळ सुरू केली. वर्दी उतरविण्याची धमकी देऊ लागला. तत्काळ गणेशपेठ पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून यादव यांना उपचारार्थ मेयो रुग्णालयात रवाना केले. आरोपी शोभितला ताब्यात घेत ठाण्यात आणून चौकशी केली. वैद्यकीय तपासणीत तो दारूच्या नशेत असल्याची खात्री पटली. पोलिसांनी शोभितविरुद्ध शासकीय कामात अडथडा निर्माण करणे, शिविगाळ करणे, दारू पिऊन वाहन चालविणे आणि धमकी देण्यासह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला. काही वेळाने त्याला सूचनापत्र देऊन सोडण्यातही आले.

# शाश्वत शेती, शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी जागर

## ॲड. आशिष जयस्वाल : श्री श्री रविशंकर यांची विशेष उपस्थिती

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ९ : वातावरण बदलातील विविध आपत्तींना सामोरे जाऊन शेतीसाठी कटिबद्ध असलेल्या शेतकऱ्यांना शाश्वत शेतीचा मंत्र मिळावा, शेती व शेतीपूरक विविध योजनातून त्यांची समृद्धी व्हावी यासाठी महाराष्ट्र शासनाने भर दिला आहे. कृषी क्षेत्रातील विविध योजनांच्या सुरेख संगमातून शेतकऱ्यांना प्रगतीचा नवा मंत्र मिळावा यासाठी रामटेक येथे नेहरू मैदानावर १२ सप्टेंबरला भव्य शेतकरी समृद्धी महोत्सवाचे आयोजन केले जात असल्याची माहिती राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिली. या महोत्सवात कृषी क्षेत्रासह श्री श्री रविशंकर यांच्या माध्यमातून सेंद्रीय नैसर्गिक शेतीचा व दुर्लभ सोमनाथ ज्योतिर्लिंग दर्शनाचा योग साधला जात आहे. महाराष्ट्र शासन कृषी विभाग मार्फत रामटेक येथील नेहरू मैदान येथे १२ सप्टेंबर रोजी सकाळी ९.४५ वाजता मेळाव्याचा शुभारंभ होईल. या महोत्सवानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, खासदार श्यामकुमार बर्वे उपस्थित राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर उपस्थित राहणार आहे.


**Form PAS-1**

*[Pursuant to section 27(1) and rule 7(2) of Companies (Prospectus and Allotment of Securities) Rules, 2014]*

**Advertisement giving details of notice of special resolution for varying the terms of any contract referred to in the prospectus or altering the objects for which the prospectus was issued**

**Corporate Identification Number (CIN)** - L93000MH1997PLC110645
**Name of the company** - Virtual Galaxy Infotech Limited
**Registered office address** - 3, Central Excise Colony, Behind Mahatme Eye Bank, Chhatrapati Square, Ring Road, Nagpur, Maharashtra, India, 440015

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that by a resolution dated 05th September 2025, the Board has proposed to alter the object(s) for which the prospectus dated: 15th May 2025 was issued in connection with issue of 65,70,000 equity Shares at an issue price of ₹ 142/- per Equity Share (including a share premium of ₹ 132/- per equity share) aggregating to ₹ 9,329.40 Lakhs.

In pursuance of the said resolution, further notice is given that for approving the said proposition, a special resolution is to be passed in the Extra Ordinary General Meeting of the Company to be held on 29th September, 2025 at 10.30 A. M. to be held through Video Conferencing ('VC') facility / Other Audio Visual Means ('OAVM').

The details regarding such variation/alteration are as follows-

**1) Particulars of the terms of the contract to be varied (or objects to be altered):**

| S. No. | Objects as stated in prospectus | IPO Proceeds (₹ in Lakhs) | Object Proposed to be Altered | Amount proposed to be utilised after altering the object (₹ in Lakhs) |
|---|---|---|---|---|
| 1. | Capital expenditure towards setting up additional development facility in Nagpur, Maharashtra; | 3,426.83 | Purchase of land on lease at MIHAN SEZ, Nagpur, Maharashtra | 630.00 |
| | | | Working Capita Requirement | 2,796.83 |
| 2. | Repayment / prepayment of certain borrowings availed by our Company; | 300.00 | No Change Proposed | |
| 3. | Investment in procuring GPU, server & storage system at Data Centre; | 505.00 | No Change Proposed | |
| 4. | Funding of expenditure related to enhancement, maintenance and upgrading existing products through manpower hiring; | 1,890.00 | No Change Proposed | |
| 5. | Funding for business development and marketing activities and | 1,406.00 | No Change Proposed | |
| 6. | General corporate purposes# | 605.54 | No Change Proposed | |

**2) Particulars of the proposed variation / alteration -**

As per the Objects of the Issue, an amount of ₹ 3,426.83 Lakhs was earmarked for Capital expenditure towards setting up additional development facility in Nagpur, Maharashtra.

As on date, a sum of ₹ 3,426.83 Lakhs is yet to be fully utilized for the aforesaid purpose. However, the Company now proposes to vary the terms of utilization of the said proceeds in the following manner:

- Purchase of land on lease at MIHAN SEZ, Nagpur, Maharashtra - ₹ 630.00 Lakhs
- Working Capital Requirement - ₹ 2,796.83 Lakhs

Accordingly, while the original object of "Capital expenditure towards setting up additional development facility in Nagpur, Maharashtra" will stand varied, the proposed utilization of funds would provide greater operational flexibility and support the growth requirements of the Company.

This variation is subject to the approval of shareholders by way of a special resolution and in compliance with applicable provisions of the Companies Act, 2013 and SEBI (ICDR) Regulations, 2018.

**3) Reasons / justification for the variation-**

The Company currently holds confirmed work orders aggregating to approximately ₹ 80.00 crores, which are at various stages of execution. Further, the Company's participation in large-scale government tenders in various states and a strong pipeline for probable orders amounting to approximately ₹ 650.00 crores necessitates a cumulative Earnest Money Deposit (EMD) of around ₹ 7.50 - 10.00 Crores, representing a portion of the anticipated total tender value. In addition, the Board of Directors of the Company has granted approval for the signing of a Memorandum of Understanding (MoU) with Xangars Infratech Solutions Limited (Xangam) for the deployment and rollout of 1,00,000 UPI QR-based Sound Boxes, valued at ₹ 69.00 crores, to be executed over a period of three years.

To successfully execute these opportunities, maintain liquidity, and ensure optimal utilization of funds, the Company proposes to reduce the allocation originally earmarked for setting up the development facility and reallocate a substantial portion towards working capital requirements. This strategic reallocation will :

(i) provide adequate liquidity for execution of current projects;
(ii) enable timely participation in Government tenders by meeting the requisite EMD requirements, and the commitments under the MoU with Xangars Infratech Solutions Limited and
(iii) Retain land in Nagpur on a long-term lease basis for future expansion, thereby aligning the Company's growth trajectory with prevailing market conditions and business priorities.

**4) Effect of the proposed variation / alteration on the financial position of the company -**

The proposed variation of object will not have any negative impact on the company. Company's cashflow is expected to improve due to the proposed variation.

**5) Major Risk factors pertaining to the new Objects**

The business operations and financial performance of the Company are subject to various risks arising from prevailing market conditions, economic performance at both domestic and global levels, political instability, changes in regulatory frameworks, and policy controls. In addition, any unforeseen events or circumstances beyond the control of the Company may materially affect its ability to execute projects, manage costs, or achieve projected growth, despite the Company's best efforts to mitigate such risks.

**6) Names of Directors who voted against the proposed variation / alteration**

None of the directors voted against the proposal.

Any interested person may obtain the copy of the special resolution along with the explanatory statement free of charge at the registered office of the company or from the Company Secretary Mrs. Anjali Vinay Padhye at **investors@vgipl.in** or visit the website of the Company viz. **https://www.vgipl.com/** for a copy of the same.

**BY ORDER OF THE BOARD OF THE DIRECTORS**
FOR **VIRTUAL GALAXY INFOTECH LIMITED**
Sd/-
**ANJALI VINAY PADHYE**
**COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER**

**Date** : 09th September 2025
**Place** : Nagpur


# पावनगाव, खुर्सापारला जिल्हास्तरीय पुरस्कार

## समृद्ध पंचायत राज अभियानाअंतर्गत कार्यशाळा

■ सकाळ वृत्तसेवा

नागपूर, ता. ९ : नागपूर जिल्हा परिषदेच्या वतीने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान' अंतर्गत कविवर्य सुरेश भट सभागृह, रेशीमबाग येथे जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात जिल्ह्यातील सरपंच, ग्रामविकास अधिकारी, नोडल अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. याप्रसंगी पावनगाव व खुर्सापारला जिल्हास्तरीय सुंदर गाव पुरस्कार जाहीर करण्यात आला.

अध्यक्षस्थानी महसूल व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, आमदार डॉ. आशिष देशमुख तसेच माजी आमदार टेकचंद सावरकर यांचा समावेश होता. पालकमंत्री बावनकुळे यांनी 'विकसित महाराष्ट्र' या संकल्पनेवर भाष्य करत ग्रामविकासाला गती देण्याचे आवाहन केले. शिक्षण, आरोग्य, अंगणवाडी आणि डिजिटल ग्राम या क्षेत्रांवर विशेष भर देण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. राज्यमंत्री जयस्वाल यांनी ग्रामपंचायतींनी अभियानात सक्रिय सहभाग घेऊन कामगिरी करण्याचे आवाहन केले. तर आमदार डॉ. आशिष देशमुख यांनी ग्रामीण विकासासाठी जनतेचा सहभाग महत्त्वाचा असल्याचे सांगितले. प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांनी केले. आभार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) कपिल कलोडे यांनी मानले, तर संचालन दिनेश मासोदकर यांनी केले.



**नागपूर :** कविवर्य सुरेश भट येथील कार्यक्रमाला उपस्थित डावीकडून सीईओ विनायक महामुनी, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि आमदार आशीष देशमुख आणि इतर.

### पुरस्काराचा निधी ४० लाखांचा

■ पावनगाव, खुर्सापारला जिल्हास्तरीय सुंदर गाव पुरस्कार प्रदान करण्यात आला. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सरपंचांना ४० लाखांचा धनादेश देण्यात आला. या प्रसंगी 'सुंदर गाव स्पर्धा २०२२-२३ व २०२३-२४' अंतर्गत जिल्हास्तरीय विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. कामठी पंचायत समिती अंतर्गत पावनगाव व खुर्सापार या ग्रामपंचायतींना प्रथम पुरस्कार देण्यात आला. याशिवाय तालुका स्तरावरील सुंदर गाव पुरस्कार आणि २०१९-२० ते २०२४-२५ या कालावधीतील आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कारांचेही वितरण झाले.

